# महाराष्ट्र शासन

## सहसंचालक, उच्च शिक्षण, नांदेड विभाग, नांदेड

**शासकीय तंत्रनिकेतनच्या पाठीमागे,आनंद नगर रोड, दत्त मंदिराशेजारी,दयानंद नगर, नांदेड ४३१६०२**

| | |
|---|---|
| दुरध्वनीक्र: - ०२४६२-२८३३१४४ | Website: -https://jdhenanded.info/ |
| E-mail: jdhe.nanded@yahoo.co.in | E-mail:jdhe.nanded-mh@gov.in |


जा.क्र.ससंउशिनां/पशियो/ २०२६-२७/ **3376840** दि. .०६.२०२६

प्रति,
**कुलसचिव,**
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
**प्राचार्य,**
शासकीय / अशासकीय अनुदानित / विना अनुदानि / कायम विना अनुदानित महाविद्यालये,
अध्यापक महाविद्यालये,
नांदेड विभाग.

**विषय :- खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या गुणवंत मुला – मुलींना परदेशातील उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजूर करणे बाबत.**

संदर्भ :- १. शासन निर्णय क्रमांक पशियो-२०२६/प्र.क्र.१४७/ई-१६६५४६०/तांशि-४ दि. १०.०६.२०२६.
२.आपल्या कार्यालयाचा इमेल दि. १२.०६.२०२६.

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या गुणवंत मुला-मुलींना परदेशातील उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजूर करण्याबाबत शासन निर्णय दिनांक १०.०६.२०२६ रोजी निर्गमित करण्यात आला असुन यापत्रासोबत सदर शासन निर्णय जोडण्यात आला आहे.

सन सन २०२६-२७ साठी खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या गुणवंत मुला- मुलींना परदेशातील उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती संदर्भाने करावयाच्या कार्यवाहीच्या अनुषंगाने आपल्या विद्यापीठातील / महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सदर शासन निर्णयाबाबत अवगत करण्यात यावे. तसेच विद्यापीठ / महाविद्यालय यांनी त्यांच्या सूचना फलकावर शासन निर्णय लावण्यात यावा व संकेतस्थळावर अपलोड करावा. ऑनलाईन अर्ज प्रणाली / वेळापत्रक वळोवेळी मिळालेल्या परिपत्रकाद्वारे/ माहितीपुस्तीकेदवरे या कार्यालयाकडून कळविण्यात येईल.

**सोबत :- शासन निर्णय**

Digitally signed by
Babasaheb Dadasaheb Bhosale
Date: 26-06-2026 13:00:21

**(डॉ. बाबासाहेब भोसले)**
सहसंचालक
उच्च शिक्षण, नांदेड विभाग,
नांदेड

प्रत,
१. मा. संचालक, उच्च शिक्षण संचालनायल, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.

**खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या गुणवंत मुला-मुलींना परदेशातील उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजूर करणे....**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक: पशियो-२०२६/प्र.क्र.१४७/ई-१६६५४६०/तांशि-४**
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-४०००३२.
दिनांक: १० जून, २०२६

**वाचा :** १. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४, दि.०४.१०.२०१८

२. शासन शुध्दीपत्रक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४, दि.३०.१०.२०१८

३. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.संकीर्ण-२०२०/प्र.क्र.११६/तांशि-४, दि.०६.०९.२०२१

४. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.बैठक-२०२२/प्र.क्र.१८८/तांशि-४, दि.३१.०७.२०२३

५. शासन शुध्दीपत्रक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.२४३/तांशि-४, दि.०६.०८.२०२४

६. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.तंशिसं / का.क्र.१८ / परदेशी शिष्यवृत्ती/सुधारित शासन निर्णय/२०२६/२३४, दि.३०.०४.२०२६ आणि पत्र क्र.१८/ तंशिसं /परदेशी शिष्यवृत्ती/२०२६/२८७, दि.२१.०५.२०२६

**प्रस्तावना :-**

विद्यार्थ्यांना परदेशात नामांकित शिक्षण संस्थामध्ये उच्च शिक्षण घेणे शक्य व्हावे याकरीता अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्ग / विशेष मागास प्रवर्ग, एस.ई.बी.सी. प्रवर्ग, अल्पसंख्याक समुदाय यांचेसाठी अनुक्रमे सामाजिक न्याय विभाग, आदिवासी विकास विभाग, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, नियोजन विभाग व अल्पसंख्याक विकास विभाग या प्रशासकीय विभागांमार्फत परदेशी शिक्षणासाठीच्या शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहेत.

तसेच, खुल्या प्रवर्गातील मुला-मुलींना परदेशातील नामांकित शिक्षण संस्थेत शिक्षण घेता यावे, याकरीता उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून गुणवंत मुला-मुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना मा.मंत्रिमंडळाने दि.२१.०८.२०१८ रोजी घेतलेल्या निर्णयानुसार, संदर्भ क्र.१ येथील दि.०४.१०.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ पासून राबविण्यात येत आहे. त्यानुसार पदव्युत्तर (पी.जी.) अभ्यासक्रमाच्या १० आणि डॉक्टरेट (पीएच.डी.) अभ्यासक्रमाच्या १० अशा एकूण २० विद्यार्थ्यांकरीता सदर योजना राबविण्यात येत होती.

त्यानंतर या योजनेच्या अंमलबजावणीच्या छाननी समितीत संदर्भ क्र. २ येथील दि.३०.१०.२०२६ रोजीच्या शासन शुध्दीपत्रकानुसार अंशत: बदल करण्यात आले. सदर योजनेच्या लाभासाठी विद्यार्थ्याची व पालकाची वार्षिक उत्पन्न मर्यादा संदर्भ क्र.३ येथील दि.०६.०९.२०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार रू.८.०० लक्ष इतकी करण्यात आली. तसेच, पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी ३० आणि डॉक्टरेट (पीएच.डी.) अभ्यासक्रमाच्या १० अशा एकूण ४० विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ देण्याचा निर्णय संदर्भ क्र.४ येथील दि.३१.०७.२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार घेण्यात आला व या योजनेच्या विद्यार्थी संख्येमध्ये २० वरुन ४० अशी वाढ करण्यात आली.

तद्नंतर परदेश शिष्यवृत्ती योजना राबविणाऱ्या विविध विभागांच्या योजनेत एकवाक्यता येण्याच्या उद्देशाने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने दि.२५.०७.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये निकषांमध्ये केलेल्या सुधारणेच्या अनुषंगाने विभागाच्या प्रचलित धोरणात आवश्यक त्या सुधारणा करण्याबाबत दि.०६.०८.२०२४ रोजी शासन शुध्दीपत्रक निर्गमित केले आहे.

उच्च व तंत्र  शिक्षण विभागांतर्गत शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून सुरु झालेल्या सदर योजनेच्या आरंभापासून झालेल्या विविध सुधारणा आणि भविष्यातील बदलांच्या अनुषंगाने फेरआढावा घेऊन प्रचलित योजनेमध्ये विद्यार्थीहितास्तव अंशत: बदल करुन शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र राज्यातील खुल्या प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी QS (Quacquarelli Symonds) Ranking २०० च्या आतील परदेशातील शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश मिळवितात, अशा विद्यार्थ्यांसाठी परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजूर करण्यात यावी, असा शासनाने निर्णय घेतला आहे.

२. सदर योजना उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत **"खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या गुणवंत मुला-मुलींना परदेशातील उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजूर करणे"** या नावाने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून अंमलात येईल.

३. खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या गुणवंत मुला-मुलींना परदेशातील उच्च शिक्षणासाठी सदर शिष्यवृत्ती योजना लागू राहील.

४. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, आदिवासी विकास विभाग, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, नियोजन विभाग व अल्पसंख्याक विकास विभाग इ. प्रशासकीय विभागांमार्फत परदेशी शिक्षणासाठीच्या राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनेकरीता पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांनी/उमेदवारांनी संबंधित प्रशासकीय विभागाच्या शिष्यवृत्ती योजनेसाठी अर्ज करणे अनिवार्य आहे. त्यामुळे **अन्य प्रशासनिक विभागाच्या परदेशी शिष्यवृत्तीच्या योजनेसाठी अर्ज करण्यास पात्र असलेले विविध प्रवर्गातील विद्यार्थी वगळून इतर सर्व उमेदवार/विद्यार्थी या योजनेसाठी खुल्या प्रवर्गाचे उमेदवार/विद्यार्थी समजण्यात येतील.**

**५.** सदर शिष्यवृत्ती योजना पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी राबविण्यात येईल. त्याकरीता विद्यार्थ्यांची अधिकतम **प्रवेशक्षमता ४०** इतकी असेल. त्यानुषंगाने अभ्यासक्रमांची शाखानिहाय विभागणी खालील तक्त्यात दर्शविण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | शाखा / अभ्यासक्रम | मंजूर विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| १. | कला | ०३ |
| २. | वाणिज्य | ०३ |
| ३. | विज्ञान | ०५ |
| ४. | व्यवस्थापन | ०४ |
| ५. | विधी अभ्यासक्रम | ०३ |
| ६. | अभियांत्रिकी व तंत्रज्ञान | १५ |
| ७. | वास्तुशास्त्र | ०३ |
| ८. | औषधनिर्माणशास्त्र | ०४ |
| | एकूण | ४० |

**६.** पदवी शिक्षण पूर्ण केल्यानंतर पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमांच्या किमान १ वर्ष आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या अधिकतम २ वर्ष इतक्या कालावधीसाठी सदर शिष्यवृत्ती अनुज्ञेय असेल.

**७.** या योजनेकरीता पीएचडी अभ्यासक्रमाचे अर्ज प्राप्त झाल्यास, अशा विद्यार्थ्यांना प्रायोजकत्व (Sponsorship) न मिळाल्याची खात्री करुन त्यांचा विचार करण्यात यावा.

८. परदेशी शिष्यवृत्तीकरीता मंजूर करण्यात येणारे अभ्यासक्रम **परिशिष्ट-अ** मध्ये स्वतंत्ररित्या नमुद करण्यात आलेले आहेत.

९. शिष्यवृत्ती द्यावयाच्या एकूण जागेपैकी ३०% जागांवर मुलींची निवड करण्यात येईल. तथापि, मुलींचे पुरेसे अर्ज प्राप्त न झाल्यास छाननी समितीच्या शिफारशीनुसार निवड समिती निर्णय घेईल.

**१०.** या योजनेसाठी सूचित केलेल्या अटी व शर्ती **परिशिष्ट-ब** मध्ये नमूद करण्यात आल्या आहेत. उमेदवारांनी परिशिष्ट-ब मधील अटी व शर्तींची पूर्तता करणे अनिवार्य आहे. यामधील आवश्यक बाबींची अंमलबजावणी विहीत पध्दतीने करण्याचे अधिकार संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना प्रदान करण्यात येत आहेत.

**११.** सदर योजनेसाठी होणारा खर्च खालील लेखाशिर्षांतर्गत खर्ची टाकण्यात येईल.

मागणी क्र. डब्ल्यू -३,मुख्य लेखाशिर्ष २२०३- तंत्र शिक्षण,
१०७, शिष्यवृत्त्या,
(००) (००) (१०), गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजूर करणे
(कार्यक्रम) -२२०३ ३५५१

१२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२६०६१०१८५५२५७७०८ असा आहे. सादर आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ASHOK SHANKAR MANDE

Digitally signed by ASHOK SHANKAR MANDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=fabb29d28cdbcbe5c9eed052cb38b8cb567068a0090e237f095c6e50a52a6cf5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=D96FF33E8AF31F745D84F3411F94D896382FAA82659B10108672887A87D6FC7C, cn=ASHOK SHANKAR MANDE
Date: 2026.06.10 18:58:00 +05'30'

**(अशोक मांडे)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. सर्व मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
६. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
८. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई
९. सर्व सन्माननीय विधानपरिषद व विधानसभा सदस्य
१०. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
११. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. सर्व प्रशासनिक विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई
१४. सह / उप सचिव (तांशि/मशि/विशि/अर्थसंकल्प), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१६. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक
१७. आयुक्त, कृषी, महाराष्ट्र राज्य, पुणे
१८. आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१९. आयुक्त, मत्स्य व्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२०. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२१. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२२. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२३. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२४. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२५. संचालक, माहिती तंत्रज्ञान, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
२६. संचालक, पशु संवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे
२७. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२८. संचालक, आय.आय.टी., पवई, मुंबई

२९. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ, मुंबइ्र
३०. कुलसचिव, सर्व कृषी/अकृषी विद्यापीठे
३१. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे, ता.माणगांव, जि.रायगड
३२. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये (सर्व), (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
३३. सहसंचालक, उच्च शिक्षण, विभागीय कार्यालये (सर्व)
३४. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
३५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र - १/२, मुंबई / नागपूर
३६. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र - १/२, मुंबई / नागपूर
३७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
३८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
३९. कक्ष अधिकारी (तांशि-२/मशि-२/मशि-३/तांशि-४/तांशि-५/तांशि-६/साशि-१), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
४०. निवडनस्ती / तांशि-४.

### शासन निर्णय क्रमांक: पशियो/प्र.क्र.१४७/ई-१६६५४६०/तांशि-४, दिनांक: १० जून,२०२६

### सोबतचे परिशिष्ट - अ

### परदेशी शिष्यवृत्तीसाठी मंजूर करण्यात येणारे अभ्यासक्रम

| Engineering / Architecture | Management | Science | Arts & Commerce | Law | Pharmacy |
|---|---|---|---|---|---|
| १. Artificial Intelligence and Machine Learning | १. M.B.A. with Finance / Marketing / H.R. / System Analysis | १. Agriculture | १. Sociology | Law | Pharmacy |
| २. Bioinformatics and Genetic Engineering | २. Hotel Management | २. Horticulture | २. Psychology | | |
| ३. Data Science and Business Analytics | | ३. Animal Husbandry | ३. Geography | | |
| ४. Renewable Energy and Sustainable Engineering | | ४. General Science | ४. Economics | | |
| ५. Cybersecurity & Information Technology Management | | ५. Maths | ५. Commerce | | |
| ६. Game Design and Virtual Reality | | ६. Science | ६. Mass Media | | |
| ७. Ethical Technology and AI Policy | | ७. Physics | | | |
| ८. Digital Marketing and Consumer Psychology | | ८. Chemistry | | | |
| ९. Civil | | ९. Botany | | | |
| १०. Mechanical | | १०.Zoology | | | |
| ११. Artificial Intelligent | | | | | |
| १२. Electrical | | | | | |
| १३. Chemical | | | | | |
| १४. Computer | | | | | |
| १५. Environmental Engineering | | | | | |
| १६. Electronics & TC | | | | | |
| १७. Information Technology/ Information Systems/ Information Science/ Computer Engineering | | | | | |
| १८. Biotechnology | | | | | |
| १९. Genetic Engineering | | | | | |
| २०. Nano Technology | | | | | |
| २१. Industry Internet of Things (IOT) | | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २२. Cyber Law/Cyber Security | | | | | |
| २३. Biomedical Engg. | | | | | |
| २४. Climate Change/ Environmental Engineering | | | | | |
| २५. Architecture | | | | | |
| **Eligibility** | | | | | |
| Graduation in Engineering/ Technology/ Science/ | Graduation in Engineering/ Technology/ Science/ Commerce/ Arts | Graduation in Science | Graduation in Arts/ Commerce | Graduation in Law | Graduation in Pharmacy |

**Note :-** The inclusion of interrelation branches/streams other than above will be defined by the Scrutiny Committee & in connection with this, the eligibility of such candidate for the scholarship will be decided by the Selection Committee.

**शासन निर्णय क्रमांक: पशियो/प्र.क्र.१४७/ ई-१६६५४६०/तांशि-४, दिनांक : १० जून, २०२६**

**सोबतचे परिशिष्ट-ब**

**(१) परदेशी शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याच्या अनिवार्य अटी व शर्ती :-**

१. विद्यार्थी व विद्यार्थ्याचे आई / वडील अथवा पालक भारताचे नागरीक तसेच महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असणे अनिवार्य आहे.

२. विद्यार्थ्यांनी परदेशातील QS मानांकन १ ते २०० असणाऱ्या विद्यापीठांत आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांसाठी निश्चित केलेल्या पदव्युत्तर पदवी किंवा पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमांपैकी या योजनेंतर्गत मान्य असलेल्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेला असावा. सदर मानांकन ज्या शैक्षणिक वर्षामध्ये प्रवेश घेत आहे, त्या शैक्षणिक वर्षाच्या मार्च/एप्रिल मधील असणे आवश्यक आहे.

तसेच, QS World Ranking १ ते २०० मधील संस्थेतील एखादी संस्था भारतात कार्यरत असेल तर अशाप्रकरणी निवड झालेल्या सबंधीत विद्यार्थ्याला भारतातील परदेशी संस्थेतील प्रवेशाकरीता शिष्यवृत्ती अनुज्ञेय करण्यात येईल.

३. विद्यार्थ्यांनी पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमात प्रवेशासाठी भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठातून किमान ५५ टक्के गुणांसह पदवी अभ्यासक्रम पूर्ण केलेला असणे आवश्यक आहे. तसेच सदर अभ्यासक्रम त्याने शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्यापूर्वी उत्तीर्ण असणे व तशी गुणपत्रिका/प्रमाणपत्र त्याचेजवळ असणे बंधनकारक आहे. शिष्यवृत्तीसाठी अर्ज करतांना विद्यार्थी अंतिम वर्षाच्या परीक्षेस ॲपिअर झालेला असेल तर त्या परीक्षेची गुणपत्रिका संचालनालयास विहित मुदतीत देण्याची संपूर्ण जबाबदारी विद्यार्थ्याची असेल. त्याबाबत त्यास विशेष मुदत दिली जाणार नाही.

४. सदर शिष्यवृत्ती उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत तंत्र शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण संचालनालय व कला संचालनालय यांच्या अखत्यारीतील पदवी अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना पुढील उच्च शिक्षणासाठी परदेशी जाण्याकरीता लागू राहील. तथापि, खाजगी विद्यापीठे आणि अभिमत विद्यापीठांतून पदवी शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना ही योजना लागू असणार नाही.

५. परदेशी विद्यापीठामध्ये विद्यार्थ्यांने पुर्णवेळ अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणे अनिवार्य आहे. अन्य कोणत्याही पध्दतीच्या अभ्यासक्रमातील प्रवेश शिष्यवृत्तीसाठी ग्राह्य धरला जाणार नाही.

६. पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केल्यानंतर पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमांचा किमान १ वर्ष इतक्या कालावधीसाठी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांचा अधिकतम २ वर्ष इतक्या कालावधीसाठी ही शिष्यवृत्ती अनुज्ञेय असेल.

७. विद्यार्थ्याने सदर शिष्यवृत्तीसाठी अर्ज करताना राज्य शासनाच्या किंवा केंद्र शासनाच्या अन्य कोणत्याही योजनेची शिष्यवृत्ती घेतलेली नसावी तसेच अर्ज केलेला नसावा. अन्य कोणत्याही संस्थेची शिष्यवृत्ती त्यास प्राप्त झालेली असेल तर विद्यार्थ्यांने त्याबाबतची माहिती, त्यास शिष्यवृत्ती मंजूर झाल्यानंतर संचालनालयास विहित कागदपत्रीय पुराव्यासहीत कळविणे आवश्यक आहे.

८. विद्यार्थ्याने ज्या विद्यापीठामध्ये ज्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला आहे त्या विद्यापीठाचे Unconditional Offer Letter अर्ज करताना जोडणे अनिवार्य आहे. Conditional offer letter ग्राह्य असणार नाही. तसेच अभ्यासक्रमाचा कालावधी, अभ्यासक्रम सुरु होण्याचा दिनांक/कालावधी आणि अभ्यासक्रम संपण्याचा दिनांक /कालावधी सदर ऑफर लेटरमध्ये सुस्पष्ट नमुद असणे आवश्यक आहे. ऑफर लेटर ज्या विद्यापीठाचे सादर केले असेल त्या विद्यापीठामध्येच/त्या अभ्यासक्रमामध्येच प्रवेश घेणे अनिवार्य राहील. शिष्यवृत्तीसाठी अर्ज सादर केल्यानंतर याबाबतचा कोणताही बदल ग्राह्य मानण्यात येणार नाही.

९. पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्याची १ जुलै रोजी ३० वर्षे इतकी वयोमर्यादा आहे. (३० वर्षे वय पूर्ण नसावे.)
१०. परदेशी शिक्षणासाठी जाण्याकरीता विद्यार्थ्याचे स्वास्थ्य चांगले असले पाहीजे व त्याने अर्ज करताना नोंदणीकृत वैद्यकिय अधिकाऱ्याने दिलेले शिक्षणासाठी परदेशी जाण्यास वैद्यकिय तंदुरूस्ती प्रमाणपत्र (Fitness Certificate for Education at abroad) सादर करणे बंधनकारक आहे.
११. विवाहीत विद्यार्थ्यांच्या पती / पत्नी व मुले यांना परदेशात सोबत घेऊन जाण्यासाठी कोणत्याही प्रकारचे सहाय्य दिले जाणार नाही. त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील.
१२. परदेशी शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्यापूर्वी जे विद्यार्थी नोकरी करत असतील तर त्यांनी नोकरीविषयक सर्व बाबी स्वत:च्या जबाबदारीने पूर्ण करावयाच्या असून, परदेशी शिक्षण सुरु झाल्यानंतर व शिष्यवृत्ती मंजूर झाल्यानंतर त्या अनुषंगाने कोणतीही सवलत/अनुमती शासनाकडून देण्यात येणार नाही.

**२. उत्पन्न मर्यादा :-**

१. विद्यार्थ्यांच्या पालकांचे/कुटूंबाचे व विद्यार्थी नोकरी करीत असल्यास त्याचे स्वत:चे उत्पन्न धरून सर्व स्त्रोतांमधून मिळणारे मागील आर्थिक वर्षातील वार्षिक एकूण उत्पन्न ₹ ८.०० लाखांपेक्षा जास्त नसावे. विद्यार्थी नोकरी करत असेल व अर्ज करण्यापूर्वी त्याने नोकरी सोडली असेल तर त्याने तसे संबंधित कार्यालयाचे प्रमाणपत्र किंवा राजीनामा मंजूरीचे पत्र सादर करणे अनिवार्य आहे.
२. विद्यार्थ्याने कौटुंबिक उत्पन्नाचा दाखला शासनाच्या महसूल विभागाने प्राधिकृत केल्यानुसार सादर करणे आवश्यक आहे. सदर उत्पन्नाचा दाखला वैध असणे, विहित मुदतीतील असणे आणि सत्य असणे ही संपूर्ण जबाबदारी विद्यार्थ्याची राहील. याबाबत कोणत्याही प्रकारची दिशाभूल आढळल्यास विद्यार्थ्यांचा शिष्यवृत्तीचा अर्ज रद्द समजण्यात येईल व त्यास शिष्यवृत्तीची प्रदाने केलेली असल्यास ती १० टक्के व्याजासहित एकरकमी व अर्ज रद्द झाल्याच्या दिनांकापासून ४५ दिवसांच्या आत वसुल केली जाईल. विद्यार्थ्याने अशी रक्कम भरणा न केल्यास त्याच्यावर फौजदारी गुन्ह्याची कारवाई केली जाईल.

**३. कुटुंबातील पात्रताधारक :-**

१. अर्जदाराच्या पालकांनी कुटूंब मर्यादीत असल्याचे प्रमाणपत्र रू.५०० च्या बाँडपेपरवर देणे अनिवार्य असून अर्जदाराच्या पालकांना दोन पेक्षा अधिक अपत्ये असल्यास व अर्जदाराचा क्रमांक दोन नंतरचा असल्यास सदर कुटुंबातील अर्जदार या शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरणार नाही. तथापि, दुसरे अपत्य जुळे असल्यास शिष्यवृत्तीच्या अर्जासाठी सदर अर्जदार पात्र ठरु शकतो.
२. एका कुटुंबातील जास्तीत जास्त दोन मुलांना परदेशी शिष्यवृत्तीचा लाभ घेता येईल.
३. एका वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेत एका कुटुंबातील दोन पाल्यांचा समावेश असल्यास प्रवेश प्रक्रियेच्या अंतिम फेरीत जागा रिक्त राहिल्यास एका कुटूंबातील दुसऱ्या पाल्यास लाभ देण्यात येईल.
४. विवाहित उमेदवारांच्या बाबतीत दोन्ही पती-पत्नी परदेशी शिष्यवृत्तीसाठी अर्ज करु शकतात व गुणवत्तेप्रमाणे त्यांच्या अर्जांचा विचार केला जाईल.
५. परदेश शिष्यवृत्ती योजनेचा लाभ एका विद्यार्थ्यास फक्त एकदाच घेता येईल. मात्र, या योजनेंतर्गत पदव्युत्तर पदवीचा अभ्यास सुरु असतांना त्या विद्यार्थ्यास डॉक्टरेट पदवी (पीएच. डी) साठी शासन निर्णयात अंतर्भूत विषयांत दर्जावाढ करण्याची संधी मिळाल्यास सदर विद्यार्थी याच योजनेंतर्गत पुढील अभ्यासक्रमासाठी लाभ घेण्यास पात्र असेल. त्यासाठी विद्यार्थ्याने निवड समिती / शासनास

रितसर अर्ज करुन मान्यता घेणे बंधनकारक राहील. अशा प्रकरणांत संबंधित शैक्षणिक संस्थेची जागतिक क्रमवारी (QS World Ranking) त्यावेळी लागू असलेल्या शासन निर्णयाच्या मर्यादेत असणे आवश्यक आहे. मात्र अशा प्रकरणांत विद्यार्थ्यांस मिळणारा एकूण लाभाचा कालावधी त्यावेळी लागू असलेल्या शासन निर्णयाच्या मर्यादेतच दिला जाईल. उदा. विद्यार्थ्यांने दोन वर्षाचा पदव्युत्तर अभ्यासक्रम करताना डॉक्टरेट (पीएच. डी) करण्यासाठी परदेशी शैक्षणिक संस्थेत दर्जावाढ प्राप्त केली तर त्या विद्यार्थ्याला शासनाने विहित प्रक्रियेद्वारे मान्यता दिल्यास त्यानंतरच्या पुढील दोन वर्षासाठी शासन निर्णयातील नमूद सर्व लाभ घेता येतील. या कालावधीनंतर होणारा पुढील संपूर्ण खर्च मात्र विद्यार्थ्याला करावा लागेल.

**४. विद्यार्थ्याने परदेशी शिष्यवृत्तीसाठी अर्ज करावयाची पध्दती –**

१. उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या या योजनेची, तंत्र शिक्षण संचालनालयाकडून सर्वसाधारण प्रतिवर्षी मे महिन्याच्या दुसऱ्या / तिसऱ्या आठवड्यात सदर वर्षासाठी खुल्या प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांनी पोर्टलव्दारे ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्यासाठी “अ” दर्जाच्या मराठी व इंग्रजी भाषेतील एका वृत्तपत्रात जाहिरात दिली जाईल. तसेच तंत्र शिक्षण संचालनालय आणि उच्च शिक्षण संचालनालय यांच्या संकेतस्थळावरदेखील जाहिरात प्रसिध्द करण्यात येईल.

२. सदर जाहिरातीमध्ये अर्ज भरावयाचा कालावधी आणि विद्यार्थ्यांनी आपल्या जिल्ह्याशी निगडीत असलेल्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या त्या त्या विभागीय कार्यालयांमध्ये जाऊन कागदपत्रांची प्रत्यक्ष पडताळणी करावयाचा कालावधी नमूद करण्यात येईल. तसेच सर्व पात्रता अटी नमूद करण्यात येतील. त्यानुसार विद्यार्थ्यांनी आपला अर्ज अचूकतेने भरावयाचा असून आवश्यक ती सर्व कागदपत्रे अपलोड करावयाची आहेत व त्याबाबत खातरजमा करुनच अर्ज सादर करावयाचा आहे.

३. विद्यार्थ्याने अर्जामध्ये नमूद केलेले विद्यापीठ, अभ्यासक्रम यानुसारच ऑफर लेटर असणे अनिवार्य असून त्यामध्ये अचूकता असणे अत्यंत आवश्यक आहे. सदर अर्जामध्ये नमूद केलेले विद्यापीठ किंवा अभ्यासक्रम यांमध्ये, शिष्यवृत्ती मंजूरीच्या कोणत्याही टप्प्यावर विद्यार्थ्याने बदल करणे ग्राह्य मानले जाणार नाही. तसेच शिष्यवृत्ती मंजूर झाल्यानंतरही विद्यार्थ्याने असे विद्यापीठ किंवा अभ्यासक्रम बदल केल्याचे निदर्शनास आल्यास सदर विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती रद्द करण्यात येईल व शिष्यवृत्ती प्रदाने केली असल्यास वसूल करण्यात येतील.

४. अर्ज सादर झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी आपण ज्या जिल्ह्यात राहतो, त्या जिल्ह्याशी निगडीत उच्च शिक्षणाच्या किंवा तंत्र शिक्षणाच्या कार्यालयामध्ये कागदपत्रांची पडताळणी करुन घ्यावयाची आहे. अशी पडताळणी न झाल्यास केवळ सिस्टीममध्ये भरलेले अर्ज विचारांत घेतले जाणार नाहीत तथा ते वैध मानले जाणार नाहीत.

५. विद्यार्थ्यांनी पात्रता व अनुषंगिक अटींप्रमाणे अर्ज भरण्यास आपण पात्र आहोत की नाही, याबाबत खात्री करुन अर्ज भरणे आवश्यक आहे. **सदर योजना फक्त खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता असून ज्या मागास प्रवर्गाच्या किंवा अन्य विविध प्रवर्गासाठीच्या (उदा. एस इ बी सी प्रवर्गातील विद्यार्थी, अल्पसंख्यांक समुदायाचे विद्यार्थी इत्यादींनी) विद्यार्थ्यांना अन्य प्रशासकीय विभागांमार्फत परदेशी शिष्यवृत्तीसाठी योजना लागू करण्यात आलेली असल्याने त्या त्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी / उमेदवारांनी त्या त्या योजनांमधून अर्ज करणे अनिवार्य आहे.** त्यामुळे अन्य प्रशासनिक विभागाच्या परदेशी शिष्यवृत्तीच्या योजनेसाठी अर्ज करण्यास पात्र असलेले विविध प्रवर्गातील विद्यार्थी वगळून इतर सर्व उमेदवार/विद्यार्थी या योजनेसाठी खुल्या प्रवर्गाचे उमेदवार/विद्यार्थी समजण्यात येतील.

६. अर्ज भरताना विद्यार्थ्यांनी ज्या विद्यापीठामध्ये ज्या अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेत आहोत त्या विद्यापीठाची आणि अभ्यासक्रमाची त्या वर्षाची QS RANKING ही १ ते २०० मध्ये असणे आवश्यक आहे व याबाबतची पूर्ण खात्री विद्यार्थ्यांनी करुनच अर्ज भरले पाहिजेत. **QS RANKING वगळता अन्य कोणतेही रँकिंग विचारात घेतले जाणार नाही याची विद्यार्थ्यांनी अर्ज भरताना विशेष दक्षता घ्यावी.**

७. ज्या परदेशात उच्च शिक्षणासाठी विद्यार्थी जात आहे, त्या देशांतील विद्यापीठाच्या प्रवेशाच्या अनुषंगाने Graduate Record Examination (GRE) / International English Language Testing System (IELTS) इत्यादी अनुषंगिक परीक्षांमधील गुणांकनाची अट पूर्ण केलेले वैध प्रमाणपत्र विद्यार्थ्याने अर्ज सादर करताना अचूकतेने अपलोड करणे अनिवार्य आहे. त्याबाबचे प्रमाणपत्र सादर न केल्यास सदर विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र असणार नाही.

८. अर्जामध्ये प्रत्येक माहिती अचूक व सत्य असली पाहिजे व तशीच भरलेली असली पाहिजे याबाबतची सर्व जबाबदारी विद्यार्थ्याची राहील. यामध्ये कोणत्याही प्रकारची दिशाभूल किंवा खोटेपणा किंवा विसंगती आढळल्यास ज्या टप्प्यावर शिष्यवृत्तीबाबतची कार्यवाही सुरु असेल त्या टप्प्यावर सदरचा अर्ज रद्द करण्यात येईल.

## ५. शिष्यवृत्तीसाठी गुणवत्तेबाबतची आणि शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरण्यासाठीची विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक तत्वे :-

१. विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेल्या विद्यापीठाची त्या वर्षीच्या QS World Ranking ची गुणवत्ता क्रमवारी विचारात घेऊन गुणवत्ता यादी बनविण्यात येईल. दोन किंवा त्यापेक्षा अधिक विद्यार्थ्यांची अशी क्रमवारी समान असल्यास त्या विद्यार्थ्यांचे लगतच्या पदवी परीक्षेची गुणवत्ता विचारात घेण्यात येईल.

२. पदव्युत्तर पदविका/पदवी अभ्यासक्रमाच्या एखाद्या शाखेमध्ये उमेदवार उपलब्ध झाला नसल्यास व अन्य एखाद्या शाखेमध्ये पात्र विद्यार्थ्यांची संख्या, शासन निर्णयांतील मुद्दा क्र.४ च्या तक्त्यात नमुद केलेल्या अभ्यासक्रमासाठीच्या निर्धारित संख्येपेक्षा अधिक असल्यास त्यातील, त्या वर्षापूरते ज्या अभ्यासक्रमात जागा रिक्त आहेत त्या अभ्यासक्रमांमध्ये आंतरसमावेशनाने अन्य अभ्यासक्रमाच्या पात्र विद्यार्थ्यास सदर तक्त्यातील अभ्यासक्रमांच्या उतरत्या क्रमानुसार आणि विद्यार्थ्याच्या गुणवत्तेनुसार शिष्यवृत्तीसाठी पात्र समजण्यात येईल. अशा स्थितीत अभ्यासक्रमांमध्ये आंतरसमावेशनाने शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आली आहे असे मानण्यात येईल व याबाबतची सर्व कार्यवाही तंत्र शिक्षण संचालनालय निवड समितीच्या शिफारशींनुसार पूर्ण करेल.

३. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांच्या विहित छाननीप्रमाणे आणि गुणवत्तेप्रमाणे विद्यार्थ्यांच्या निवडीबाबतचा व शिष्यवृत्तीबाबतचा महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने घेतलेला निर्णय अंतिम राहील. याबाबत विद्यार्थ्यास काही न्यायालयीन दाद मागावयाची झाल्यास न्यायालयीन क्षेत्र मुंबई हे राहील.

४. त्या त्या वेळच्या शासन धोरणानुसार आणि विद्यार्थी पूर्ण क्षमतेने उपलब्ध न झाल्यास वर्षातून एका पेक्षा अधिक वेळा निवड प्रक्रिया राबविण्याची मुभा राहील मात्र त्यामध्ये गुणवत्ता यादीचे निकषांमध्ये कोणताही बदल असणार नाही.

५. पासपोर्ट व शिक्षणासाठीचा व्हिसा मिळवण्याची संपूर्ण जबाबदारी विद्यार्थ्याची असेल. विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरणे आणि त्याने विद्यापीठाकडून प्राप्त झालेल्या ऑफर लेटरनुसार व्हिसा

मिळवणे या दोन्ही स्वतंत्र बाबी आहेत. याबाबत कोणतेही शुल्क शिष्यवृत्ती अंतर्गत प्रदान केले जाणार नाही.

६. शासनाकडून शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांचा शासन निर्णय निर्गमित होईपर्यंत याबाबत कोणतीही माहिती जाहीर करण्यात येत नाही. विद्यार्थी सदर शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरल्यानंतरच व संबंधित विद्यापीठात प्रत्यक्ष रुजू झाल्याचे विद्यापीठाकडून व विद्यार्थ्याकडून कळविण्यात आल्यानंतरच त्यास शिष्यवृत्तीची प्रदाने करण्यात येतात, त्यापूर्वी कोणतीही प्रदाने करण्यात येत नाहीत. त्यामुळे सदर विद्यापीठातील प्रवेशाचे संदर्भाने आवश्यक निकषांची पूर्तता करण्याची जबाबदारी विद्यार्थ्याची राहील.

**६. शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थी पात्र ठरल्यानंतरची कार्यपध्दती –**

१. विद्यार्थ्याने विहीत पध्दतीने अर्ज केल्यानंतर छाननी समिती आणि निवड समितीने त्या अर्जाबाबत संचालनालयास कळविलेल्या शिफारशींनुसार संचालनालयाने शासनास प्रस्ताव सादर केल्यानंतर शासनाकडून याबाबत अंतिम मंजूरी शासन निर्णयाव्दारे देण्यात येते.

२. सदर शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर परदेशी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरलेले विद्यार्थी ज्या जिल्ह्यामध्ये रहात आहेत त्या जिल्ह्याशी निगडीत तंत्र शिक्षण संचालनालयाच्या विभागीय कार्यालयांच्या अधिकाऱ्यांमार्फत गृहचौकशी करण्यात येते. गृहचौकशी अहवाल विभागीय कार्यालयांकडून प्राप्त झाल्यानंतर त्यामध्ये नोंदविण्यात आलेल्या शिफारशींनुसार तंत्र शिक्षण संचालनालय संबंधित विद्यार्थ्यांच्या विद्यापीठांना सदर विद्यार्थ्यास महाराष्ट्र शासनाकडून शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आलेली आहे हे कळविण्यात येते व त्या पत्राची प्रत विद्यार्थ्यास पोर्टलव्दारे / ई-मेलव्दारे कळविण्यात येते.

३. गृहचौकशी अहवालादरम्यान विद्यार्थी शिक्षणासाठी परदेशी गेलेला असणे सर्वसाधारणपणे अपेक्षित आहे. त्या स्थितीत परदेशी जाण्यापूर्वी विद्यार्थ्याने विहित नमुन्यातील पॉवर ऑफ अॅटर्नी पालकांकडे देणे आवश्यक आहे. गृहचौकशी अहवालामध्ये पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांनी/पालकांनी रू.५००/- च्या बाँड पेपरवर विहित नमुन्यातील नोटराईज्ड बंधपत्र (मूळप्रत) संचालनालयाकडे सादर करावयाचे आहे. विद्यार्थी परदेशी गेलेला असल्यास सदर बंधपत्रावर पालकांची स्वाक्षरी ग्राह्य मानली जाईल. सदर बंधपत्रावर दोन जामिनदारांची स्वाक्षरी असणे अनिवार्य आहे. बंधपत्राचा मसुदा शासन निर्णयासोबत जोडण्यात आलेला आहे.

४. गृहचौकशी अहवाल, बंधपत्राचे सादरीकरण या सर्व बाबी विद्यार्थ्यांनी यथास्थिती पूर्ण केल्यानंतर त्यांच्या शिष्यवृत्ती प्रदानासाठी आवश्यक कार्यपध्दती (विहित नमुन्यांची पूर्तता, विद्यापीठाकडून आवश्यक माहिती इत्यादी) संचालनालय स्तरावर अनुसरली जाईल व त्या संदर्भातील पूर्ततेची संपूर्ण जबाबदारी विद्यार्थ्याची असेल. याबाबत कोणतीही कागदपत्रे अपूर्ण राहीली असल्यास व त्यामुळे शिष्यवृत्तीस विलंब झाल्यास विद्यार्थी त्यासाठी जबाबदार असेल.

५. विद्यार्थ्याने ऑफर लेटर प्रमाणे संबंधित विद्यापीठात अभ्यासक्रम सुरु होतानाच प्रत्यक्ष हजर असणे आवश्यक असून शिष्यवृत्ती मंजूरीस अपवादात्मक स्थितीत विलंब झाल्याने वा अन्य कारणाने विद्यार्थी संबंधित विद्यापीठात ऑफर लेटरमध्ये नमुद मुदतीत हजर न राहील्यास ती पूर्णत: विद्यार्थ्याची जबाबदारी असेल. मात्र अशा प्रकरणी त्या त्या शैक्षणिक वर्षाच्या/आर्थिक वर्षाच्या मुदतीत राहूनच अधिकतम सहा महिन्यांची मुदतवाढ विद्यार्थ्यास मंजूर करण्याचे अधिकार तंत्र शिक्षण संचालनालयाच्या शिफारशींनुसार शासनास असतील.

६. विद्यार्थ्याने प्रथमत: सदर परदेशांत अभ्यासक्रमांसाठी जाताना, प्रवासाचा दिनांक, विमानाची वेळ व विमानाचा क्रमांक तसेच ई-तिकीटची कॉपी ई-मेलव्दारे संचालनालयास पाठवणे बंधनकारक असून अभ्यासक्रम पूर्ण करुन परत येतानाही अशा प्रकारे माहिती देणे आवश्यक आहे.

७. विद्यार्थ्यास शिष्यवृत्तीसाठी मंजूरी प्राप्त झाल्यानंतर प्रत्यक्षात तो संबंधित विद्यापीठात सदरहू अभ्यासक्रमांस प्रत्यक्ष प्रवेश घेऊ शकला नाही किंवा उपस्थित झाला नाही व त्यास मुदतवाढ मंजूर झालेली नसल्यास अशा विद्यार्थ्यास या शिष्यवृत्तीसाठी पुढील वर्षी ऑफर लेटरसहीत सर्व प्रक्रिया नव्याने पूर्ण करुन नव्याने अर्ज सादर करावा लागेल.

८. विद्यार्थ्याने शिष्यवृत्तीचे शिक्षण शुल्क विद्यापीठाकडे भरणा करण्याबाबत कळविल्यास आणि संबंधित विद्यापीठाकडून बँक अकाऊंटबाबतची माहिती संचालनालयास प्राप्त झाली असल्यास सदर शिक्षण शुल्क विद्यापीठाच्या खात्यावर पाठविण्याची कार्यवाही संचालनालय स्तरावरुन करण्यात येईल. ज्या प्रकरणी विद्यार्थ्यांनी विद्यापीठाकडे शुल्क भरणा केले आहे त्या विद्यार्थ्यांना सदर शुल्क त्यांचे भारतातील किंवा परदेशी वैयक्तिक खात्यावर पाठविण्याचे अधिकार संचालनालयास राहतील.

९. विद्यार्थ्याने निवड केलेला अभ्यासक्रम ऑफर लेटरमध्ये नमुद केलेल्या कालावधीतच पूर्ण करणे बंधनकारक असून त्या कालावधीमध्ये कोणतीही वाढ झाल्यास त्याबाबतचा कोणताही अतिरीक्त निधी विद्यार्थ्यास मंजूर केला जाणार नाही.

१०. शिष्यवृत्तीची रक्कम प्रदान केल्यानंतर, विद्यार्थ्याने शिष्यवृत्तीसाठी सादर केलेला अर्ज, त्यासोबतची सहपत्रे यांमध्ये कोणत्याही प्रकारची विसंगती किंवा खोटी माहिती दिल्याचे आढळल्यास शिष्यवृत्तीची रक्कम एकरकमी वसुल करण्यात येईल व त्याबाबत आवश्यकतेप्रमाणे बंधपत्रावर स्वाक्षरी करणाऱ्या जामीनदारांस जबाबदार धरण्यात येईल. अशा प्रकरणी विद्यार्थ्यांवर व संबंधीतांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**७. विद्यार्थ्यास शिष्यवृत्तीच्या अनुषंगाने अनुज्ञेय असलेले लाभ व अनुज्ञेय नसलेल्या बाबी -**

१. विद्यार्थ्यास विद्यापीठाने इनव्हॉईसवर नमुद केलेले प्रत्येक सत्राचे /वर्षाचे फक्त शिक्षण शुल्क, वैयक्तीक आरोग्य विम्याचे इनव्हॉईसवर/बिलावर नमुद केल्याप्रमाणे अभ्यासक्रमपूर्णतेच्या कालावधीपर्यंतचे संपूर्ण शुल्क, निर्वाह भत्ता (प्रत्येक वर्षासाठी, युनायटेड किंगडम मधील विद्यापीठांसाठी ९९०० जीबीपी आणि युनायटेड किंगडम वगळता अन्य देशातील विद्यापीठांसाठी १५४०० युएसडी) तसेच आकस्मिक खर्च भत्ता (प्रत्येक वर्षासाठी, युनायटेड किंगडम मधील विद्यापीठांसाठी ११०० जीबीपी आणि युनायटेड किंगडम वगळता अन्य देशातील विद्यापीठांसाठी १५०० युएसडी) सत्रनिहाय/वर्षनिहाय पध्दतीने प्रदान केले जाईल.

२. शिक्षणासाठी प्रथमत: जाताना व शिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर परत येताना असे नजीकच्या मार्गाचे इकॉनॉमिक क्लासचे विमान तिकीटाचे भाडे यासाठी ई- बोर्डींग पास/मुळ बोर्डींग पास आणि ई-तिकीट/ मूळ तिकिट अनिवार्य आहे.

३. विद्यार्थ्यांने परदेशी शिष्यवृत्तीसाठी सादर केलेल्या ऑफर लेटरमध्ये नमुद असल्याप्रमाणेच फक्त शिक्षण शुल्क प्रदान करण्यात येईल, अन्य कोणतेही कर प्रदान केले जाणार नाहीत. मात्र सदर विद्यापीठाच्या सदर अभ्यासक्रमाच्या शिक्षण शुल्कामध्ये वाढ झाल्यास परदेशातील भारतीय उच्चायुक्तालयाच्या शिफारशीनंतर आणि शासनाच्या मान्यतेनुसार सदरची वाढ विद्यार्थ्यास अनुज्ञेय राहील.

४. परदेशी शिष्यवृत्तीसाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना खालील बाबींवरील कोणताही खर्च अनुज्ञेय असणार नाही.
   १. पासपोर्ट/ व्हिसा अर्जासंदर्भातील खर्च
   २. भाषा प्रशिक्षणावरील खर्च
   ३. विद्यार्थ्याच्या कुटुंबातील सदस्यांचा प्रवास व इतर खर्च
   ४. नियमित शिक्षणाच्या अभ्यासक्रमाव्यतिरीक्त इतर कोणत्याही अभ्यासक्रम अथवा प्रशिक्षणावरील खर्च
   ५. नियमित अभ्यासक्रमाच्या कालावधीत अतिरीक्त प्रवासाचा खर्च
   ६. संशोधन, क्षेत्र भेटी, कार्यशाळा/सेमिनार इत्यादींमधील सहभागाचा खर्च
   ७. शिक्षण शुल्क, निर्वाह भत्ता, वैयक्तीक आरोग्य विमा आणि यासाठी निर्धारीत केलेल्या दरापेक्षा कोणताही जास्तीचा खर्च
५. शासन निर्णयानुसार परदेशी शिष्यवृत्ती मंजूर झाल्यानंतर विद्यापीठामध्ये शिक्षण शुल्काच्या अनुषंगाने काही रक्कम भरणा करावयाची असल्यास तशी आगाऊ रक्कम विद्यार्थ्यास विद्यापीठाच्या पत्रानुसार/ई-मेलनुसार प्रदान करण्याबाबत तंत्र शिक्षण संचालनालयाकडून आवश्यक कार्यवाही करण्यात येईल. मात्र अशी रक्कम विद्यार्थ्यास भरावयाच्या असलेल्या पहिल्या सत्राच्या शिक्षण शुल्काच्या २५ टक्यांपेक्षा अधिक असणार नाही व सदर रक्कम पहिल्या सत्राच्या शिष्यवृत्ती प्रदानाच्या देयकांमधून समायोजित करण्यात येईल. मात्र याबाबतचे सर्व अधिकार तंत्र शिक्षण संचालनालयास, त्या त्या वेळी प्रत्यक्ष उपलब्ध असलेल्या अनुदानास अनुलक्षून असतील.

**८. शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्याने पाळावयाच्या अटी व शर्ती आणि शिष्यवृती मंजूरीच्या अनुषंगाने महत्त्वाच्या सूचना -**

१. विद्यार्थ्याने शिष्यवृत्तीचा लाभ शिक्षण पूर्ण होईपर्यंत अबाधित राखण्यासाठी प्रत्येक सत्र/वर्ष निहाय परीक्षांना उत्तीर्ण होणे बंधनकारक असून त्याबाबतची गुणपत्रिका प्रत्येक सत्रानंतर/वर्षांनतर संचालनालयास सादर करणे अनिवार्य आहे. अशा प्रकारे गुणपत्रिका सादर न केल्यास विद्यार्थ्याचे पुढील सत्राचे/वर्षाचे शिष्यवृत्ती प्रदान रोखण्याचा संचालनालयास अधिकार आहे.
२. अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर अंतिम परीक्षेचे गुणपत्रक, प्रमाणपत्र, पदवीदान समारंभाचे छायाचित्र इत्यादी माहिती संचालनालयास सादर करणे अनिवार्य आहे. ही कागदपत्रे सादर केल्यानंतर परतीच्या प्रवासाचा विमान तिकीट खर्च विद्यार्थ्यास प्रदान करण्यात येईल.
३. विद्यार्थ्याने परदेशी गेल्यानंतर आपल्या निवासाबाबतचा करार किंवा त्याबाबतचा लेखी पुरावा संचालनालयास सादर करणे अनिवार्य आहे. तसा पुरावा सादर न केल्यास / किंवा त्यामध्ये कोणत्याही प्रकारची दिशाभूल आढळल्यास विद्यार्थ्यांस निर्वाह भत्ता प्रदान करण्यात येणार नाही वा केलेला असल्यास एकरकमी वसुल करण्यात येईल.
४. विद्यार्थ्यास परदेशी शिष्यवृत्ती प्रदान करताना अतिरीक्त रक्कम प्रदान झाल्याचे संचालनालयाच्या निदर्शनास आल्यास सदर रकमेची परतफेड करणे विद्यार्थ्यावर बंधनकारक राहील. सदर रक्कम विद्यार्थ्याने तात्काळ परत करावयाची असून तसे न केल्यास प्रचलित कायदे आणि नियमांनुसार सदर विद्यार्थ्यावर कारवाई करण्याचे सर्वाधिकार संचालनालयास असतील.
५. परदेशी शिक्षण घेत असताना ज्या कालावधीमध्ये शैक्षणिक संस्थेपासून विद्यार्थी दूर असेल, व याबाबत विद्यापीठाने तसे कळविल्यास तेवढ्या कालावधीचा कोणताही खर्च त्यास अनुज्ञेय होणार

नाही. तथापि, तो पुन्हा त्याच शैक्षणिक संस्थेत त्याच अभ्यासक्रमाचे पुढील शिक्षण पूर्ण करण्यासाठी हजर झालेल्या दिवसापासून त्यास देय लाभ अनुज्ञेय होतील.

६. विद्यार्थ्यास परदेशामध्ये शिक्षण घेत असताना, अत्यंत अपरिहार्य कारणास्तव विद्यार्थ्यास भारतात यावयाचे झाल्यास सदर शैक्षणिक संस्थेची पूर्वपरवानगी घेणे, भारतीय दुतावासास त्याबाबत कळवणे आणि या संचालनालयास तसे ई-मेलव्दारे अवगत करुन देणे आवश्यक आहे. याबाबतच्या कोणत्याही नियमांचे पालन न केल्यास व भारतात परत आल्याबाबतची खात्री झाल्यास त्या कालावधीचा निर्वाह भत्ता त्यास अनुज्ञेय राहणार नाही.

७. विद्यापीठातील संबंधित विभागप्रमुखाने प्रमाणित केलेले प्रत्येक सहा महिन्याच्या कालावधीचे उपयोगीता प्रमाणपत्र विद्यार्थ्याने सादर करणे बंधनकारक आहे. तसे सादर न केल्यास विद्यार्थ्याचे पुढील सत्राचे/वर्षाचे निर्वाह भत्ता व आकस्मिक खर्च भत्ता ही प्रदाने रोखण्याचा संचालनालयास अधिकार आहे.

८. परदेशी शिक्षण घेत असताना विद्यार्थ्याने कोणतीही नोकरी करणे अपेक्षित नाही. मात्र विद्यार्थी तसे करत असल्यास त्याबाबतचे सर्व नियम पाळण्याची व वेतन अनुषंगिक बाबींची सर्व जबाबदारी ही विद्यार्थ्याची असेल. महाराष्ट्र शासनाकडून याबाबत कोणतीही जबाबदारी घेतली जाणार नाही.

९. परदेशी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्याने कोणत्याही प्रकारे मुळ शैक्षणिक कर्तव्यात कसूर करु नये. बंधपत्रामध्ये नमुद केलेल्या सर्व बाबींची पालन करणे, शैक्षणिक सत्रांना उपस्थित असणे, विहित सर्व परीक्षा उत्तीर्ण होणे, शिक्षण पूर्ण करणे अशा अनुषंगिक सर्व बाबींचे विद्यार्थ्याने पालन करणे आवश्यक आहे.

१०. विद्यार्थ्याने अभ्यासक्रम संपल्यानंतर तात्काळ भारतात/महाराष्ट्रात येणे अनिवार्य असून त्याने व्हिसावाढीसाठी संचालनालयास अर्ज करणे वा विनंती करणे अपेक्षित नसून तशी विनंती मान्य केली जाणार नाही.

११. विद्यार्थ्याने अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर भारतात/महाराष्ट्रात परत आल्यानंतर तसे तंत्र शिक्षण संचालनालयास कळवणे अनिवार्य आहे. त्यानुसार विद्यार्थी राज्यामध्ये परत आल्यानंतर त्याने उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्त्याखालील शासकीय तथा अशासकीय अनुदानित संस्थांमध्ये ३ वर्ष सेवा देणे अनिवार्य असून या कालावधीत त्या विद्यार्थ्यास विद्यापीठ अनुदान आयोगाच्या व अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या नियमानुसार प्रतिमाह विद्यावेतन देण्यात येईल. विद्यार्थ्यास ३ वर्ष अनिवार्य सेवा देणे शक्य नसल्यास त्यास शैक्षणिक कालावधीमध्ये प्रदान करण्यात आलेल्या एकूण शिष्यवृत्तीच्या २५ टक्के इतकी रक्कम शासनखाती जमा करावी लागेल.

३ वर्ष अनिवार्य सेवा देण्याच्या कालावधीतील विद्यार्थ्यांस द्यावयाचे प्रतिमाह विद्यावेतन व अनिवार्य सेवेस नकार दिल्यास एकूण शिष्यवृत्तीच्या २५ टक्के इतकी रक्कम शासन खाती जमा करणे याबाबत स्वतंत्र प्रस्ताव तंत्र शिक्षण संचालनालयाने शासनास सादर करणे आवश्यक राहील.

१२. विद्यार्थी उच्चस्तरीय शिक्षणासाठी परदेशी वास्तव्यास असताना, या देशाचा नागरीक आणि या राज्याचा रहिवासी असे प्रतिनिधीत्व करत असल्याने राज्याच्या/देशाच्या प्रतिमेस हानी पोहोचेल असे कोणतेही वर्तन विद्यार्थ्याने करु नये. तसे आढळल्यास याबाबत विद्यार्थ्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल व त्या अनुषंगाने त्यास देण्यात आलेली शिष्यवृत्ती रद्द करण्यात येईल व प्रदान करण्यात आलेल्या सर्व रकमा त्याचेकडून एकरकमी वसुल करण्यात येतील. या अनुषंगाने आवश्यकतेनुसार विद्यार्थ्याची शैक्षणिक प्रगती, उपस्थिती, परदेशांतील त्याची वर्तणूक, या बाबतची माहिती सदर परदेशातील भारतीय दूतावासाकडून प्राप्त करुन घेण्यात येईल व त्यामध्ये आक्षेपार्ह

आढळल्यास विद्यार्थ्याची शिष्यवृत्ती तात्काळ रद्द करण्यात येईल आणि प्रदान करण्यात आलेली शिष्यवृत्ती एकरकमी वसुल करण्यात येईल.

**९. परदेशी शिष्यवृत्ती मंजूरीसाठी छाननी समिती –**

परदेशी शिष्यवृत्तीच्या शासन निर्णयांतील सर्व तरतूदींनुसार संचालनालयास प्रकरण निहाय आवश्यक त्या शिफारशी करण्यासाठी पुढीलप्रमाणे छाननी समिती गठीत करण्यात येत आहे:-

| अ.क्र. | समिती सदस्याचे कार्यालय व पद | समितीमधील पद |
|---|---|---|
| १ | संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय | अध्यक्ष |
| २ | सहसचिव/उपसचिव तंत्र शिक्षण | सदस्य |
| ३ | सहसचिव/उपसचिव उच्च शिक्षण | सदस्य |
| ४ | सहसंचालक, उच्च शिक्षण किंवा त्यांचे वर्ग-१ पदावरील कार्यरत प्रतिनिधी | सदस्य |
| ५ | सहसंचालक तंत्र शिक्षण | सदस्य |
| ६ | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे मुंबई येथील कार्यालयातील वर्ग-१ पदावरील अधिकारी | सदस्य |
| ७ | तंत्र शिक्षण संचालनालयातील शिष्यवृत्ती विभागाचे प्रणाली व्यवस्थापक किंवा उपसंचालक दर्जाचे अधिकारी | सदस्य सचिव |

**समितीची कार्यकक्षा –**

१. उच्च व तंत्र शिक्षण संचालनालयाकडे परदेशी शिष्यवृत्तीसाठीचे ऑनलाईन पध्दतीने/व्हाया पोर्टल प्राप्त झालेल्या सर्व अर्जांची सोबतच्या सहपत्रांची छाननी करणे.

२. शासन निर्णयांतील तरतुदींनुसार परदेशी शिष्यवृत्तीसाठी प्रकरणनिहाय विद्यार्थ्यांना पात्र / अपात्र अशी निवड समितीकडे शिफारस करणे.

३. छाननीअंती, विद्यार्थ्यांना कागदपत्रांच्या पूर्ततेसाठी आवश्यकतेप्रमाणे योग्य ती मुदतवाढ देणे व पूर्ततेप्रमाणे पुढील कार्यवाही करणे.

४. प्रकरणनिहाय विद्यार्थी पात्र /अपात्र शिफारस करताना गुंतागुंतीची प्रकरणे किंवा अनुषंगिक धोरणात्मक बाबीच्या अनुषंगाने निवड समितीस यथायोग्य शिफारस करणे.

**१०. परदेशी शिष्यवृत्ती मंजूरीसाठी निवड समिती –**

परदेशी शिष्यवृत्तीच्या शासन निर्णयांतील सर्व तरतूदींनुसार संचालनालयास छाननी समितीकडून करण्यात आलेल्या शिफारशीनुसार पुढील आवश्यक कार्यवाही करण्यासाठी खालीलप्रमाणे निवड समिती गठीत करण्यात येत आहे. छाननी समितीच्या इतिवृत्तानुसार कागदपत्रांची आवश्यक ती पडताळणी करुन त्या वर्षांकरीता परदेशी शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांची अंतिम निवड करणे व शासनास अनुषंगिक शासन निर्णय निर्गमित करण्यासाठी शिफारस करण्याकरीता निवड समितीचे गठन करण्यात येत आहे:-

| अ.क्र. | समिती सदस्याचे कार्यालय व पद | समितीमधील पद |
|---|---|---|
| १ | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव, उच्च व तंत्र शिक्षण | अध्यक्ष |

| | | |
|---|---|---|
| | विभाग | |
| २ | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव वित्त विभाग अथवा उप/सह सचिव दर्जापेक्षा कमी नसलेले त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ३ | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव नियोजन विभाग अथवा उप/सह सचिव दर्जापेक्षा कमी नसलेले त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ४ | संचालक, उच्च शिक्षण | सदस्य |
| ५ | सहसचिव/उपसचिव तंत्र शिक्षण | सदस्य |
| ६ | सहसचिव /उपसचिव उच्च शिक्षण | सदस्य |
| ७ | आय. आय. टी. पवई, मुंबई या संस्थेचा किमान प्राध्यापक दर्जाचा प्रतिनिधी | सदस्य |
| ८ | संचालक, तंत्र शिक्षण | सदस्य सचिव |

**समितीची कार्यकक्षा –**

१. उच्च व तंत्र शिक्षण संचालनालयाकडे प्राप्त झालेल्या व छाननी समितीने पात्र / अपात्र अशी शिफारस केलेल्या सर्व तक्त्यांची /अर्जांची पडताळणी करुन अंतिमरित्या विद्यार्थ्यांना पात्र / अपात्र ठरवणे.

२. शासन निर्णयांतील तरतुदींनुसार परदेशी शिष्यवृत्तीसाठी छाननी समितीने निवड समितीसमोर विचारार्थ ठेवलेल्या गुंतागुंतीच्या प्रकरणांबाबत धोरणात्मक निर्णय घेणे.

३. पात्र विद्यार्थ्यांना परदेशी शिष्यवृत्ती मंजूरीची शिफारस करणे व अनुषंगिक शासन निर्णय विहित मुदतीत निर्गमित होण्यासाठी शिफारस करणे.

**" खुल्या प्रवर्गातील गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती " योजनेसाठीचे बंधपत्र**

(सदर बंधपत्र विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीसाठी शासनाकडून मान्यता मिळाल्यानंतर ₹५००/- च्या स्टँप पेपरवर नोटराईज करुन सादर करणे अनिवार्य आहे.)

**मी/आम्ही** बंध पत्र लिहून देणार :-

(१) **विद्यार्थी : पूर्ण नाव** ___________ वय _____राहणार (संपूर्ण पत्ता दूरध्वनी आणि भ्रमणध्वनीसह)
__________________________________________________
__________________________________

(२) **विद्यार्थ्याचे पालक:**
**पालकाचे पूर्ण नाव** ________________________________________
वय ______राहणार (संपूर्ण पत्ता दूरध्वनीसह)
__________________________________________________
______________________
आधार कार्ड क्रमांक - (सोबत स्वसाक्षांकित छायांकित प्रत जोडावी)

(३) **जामीनदार (१) : जामीनदाराचे नांव** _________________ वय______राहणार (संपूर्ण पत्ता दूरध्वनीसह___________________________________________
________________________________
आधार कार्ड क्रमांक - (सोबत स्वसाक्षांकित छायांकित प्रत जोडावी)

(४) **जामीनदार (२) : जामीनदाराचे नांव** ____________________ वय ___________ राहणार (संपूर्ण पत्ता दूरध्वनीसह)___________________________________________
______________________________
आधार कार्ड क्रमांक - (सोबत स्वसाक्षांकित छायांकित प्रत जोडावी)

**" गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत, शिष्यवृत्तीसाठी मी/आम्ही सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो / करते व हमी देतो ते येणे प्रमाणे,**

१. मी (विद्यार्थी/विद्यार्थीनी)________________ सन ________(वर्ष नमूद करावे) वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी (देशाचे नाव) _______________________येथील__________________विद्यापीठ / शिक्षण संस्थेचे नांव व पत्ता) ____________________________________ येथे (अभ्यासक्रमाचे नांव) __________________________________साठी प्रवेश घेतला असून मी

खुल्या प्रवर्गासाठी असलेल्या परदेशी शिष्यवृत्तीसाठी अर्ज केल्यानुसार शासनाने दिनांक__________च्या शासन निर्णयानुसार मला सदर शिष्यवृत्तीसाठी मंजूरी दिली आहे.

२. मी, विद्यार्थ्या/र्थीनीचा चा पालक (पालकांचे नाव ) __ ____ _____ _______ ___असून, (विद्यार्थ्याचे नाव)__________________ असून एकूण मुलांची संख्या _____ इतकी आहे. यापैकी आता पर्यंत ------ पाल्याने या योजनेचा लाभ घेतलेला आहे / नाही.

३. आम्ही विद्यार्थी, पालक व जामीनदार मिळून अशी हमी देतो की, परदेश शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेताना ज्या अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती मंजूर होईल तो अभ्यासक्रम पूर्ण करण्याची जबाबदारी श्री / कुमारी __________________ याची राहील. तथापि, त्याने/तिने अभ्यासक्रम अर्धवट सोडल्यास शासनामार्फत खर्च करण्यात आलेली शिष्यवृत्तीची संपूर्ण वसूल पात्र रक्कमेस आम्ही जबाबदार राहू व ती रक्कम शासनास परत करण्याचे बंधन आमच्यावर राहील. तसेच याबाबत रक्कम परत करण्यासाठी मी स्वत:, माझे पालक व दोन्हीही जामिनदार यांचेकडून किंवा त्यांच्या स्थावर मालमत्तेमधून सदर रक्कम वसूल करण्याचे अधिकार शासनास / तंत्र शिक्षण संचालनालयास असतील हे मला मान्य आहे.

४. मला शासनाने मंजूर केलेल्या परदेशातील विद्यापीठ व शैक्षणिक अभ्यासक्रमात मी परस्पर बदल करणार नाही. तसे केल्यास माझी शिष्यवृत्ती रद्द होईल आणि शिष्यवृत्ती प्रदाने प्राप्त झाली असल्यास ती १० टक्के व्याजाने वसुल केली जातील हे मला मान्य आहे.

५. मी सद्यस्थितीत____________________________ येथे नोकरीस असून सदर कार्यालयातील प्रशासकीय बाबी उदा. रजा, वेतन आणि इतर सेवेच्या बाबी या स्वत: प्रत्यक्षपणे निराकरीत करेल यासाठी कोणत्याही प्रकारची सवलत शासनाकडून घेणार नाही. (नोकरी करणाऱ्यांसाठी लागू)

६. अर्जासोबत सादर केलेले कागदपत्रे / प्रमाणपत्रे हे खोटे व बनावट असल्याचे आढळून आल्यास माझी शिष्यवृत्ती रद्द होईल याची मला जाणीव असून शिष्यवृत्ती प्रदाने प्राप्त झाली असल्यास ती १० टक्के व्याजाने वसुल केली जातील हे मला मान्य आहे.

७. परदेशामध्ये शिक्षण घेत असतांना काही कारणास्तव राज्य शासनाच्या पूर्व परवानगीने परदेशातून भारतात काही कालावधीसाठी वास्तव्य केले असेल तर सदर कालावधीची निर्वाह भत्त्याची रक्कम मला अनुज्ञेय होणार नाही. मला शिक्षण फी (Tuition Fee) व निर्वाह भत्ता यासाठी शासनाने निर्धारित केलेल्या दरापेक्षा कोणताही जास्तीचा खर्च अनुज्ञेय होणार नाही.

८. परदेश शिष्यवृत्ती अंतर्गत परदेशात शिक्षण घेत असताना जास्तीची रक्कम शासनातर्फे मला अदा झाली असल्याचे निदर्शनास आल्यास त्याची तात्काळ परतफेड करेन. अथवा न केल्यास ती वसुल करणेबाबत प्रचलित कायदे व नियमानुसार /तथा फौजदारी गुन्ह्यांसदर्भातील कारवाईस मी पात्र असेन.

९. या योजनेखाली निवड झालेल्या मला _______________________ परदेशात शिक्षण घेताना नियमाचे तसेच अटी व शर्तीचे आणि बंधपत्रामध्ये लिहून दिलेल्या बाबींचे उल्लंघन केल्यास, परदेशीय शैक्षणिक संस्थेने अभ्यासाविषयी अथवा वागणूकीविषयी अथवा गैरहजेरी विषयी प्रतिकूल अहवाल दिल्यास, प्रवेश अर्धवट सोडला असल्यास, जेथे प्रवेश घेतला आहे तो देश सोडून निघून गेल्यास किंवा मी दुसरे विद्यापीठ / शैक्षणिक संस्थेमध्ये विनापरवानगी प्रवेश घेतला असल्यास, किंवा ज्या अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे, तो अभ्यासक्रम त्यांने

विनापरवानगी बदलल्यास, किंवा तो भारतात कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता परत आल्यास, किंवा अशा प्रकारच्या कोणत्याही गैरवर्तणुकीसंदर्भात मला अवज्ञाधारक तथा कर्तव्यनिष्ठुर (Defaulter) समजण्यात येईल आणि मला देण्यात आलेली शिष्यवृत्तीची सर्व रक्कम १२% वार्षिक व्याजाने वसूल करण्यात येईल व त्याबाबत माझी कोणतीही हरकत असणार नाही, हे मला मान्य आहे.

१०. मी (विद्यार्थ्याचे नाव) ______ ________ ____________ ______ _____अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर पुढील ६० दिवसांच्या आत अंतिम परीक्षेची गुणपत्रिका व प्रमाणपत्र संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य, मुंबई/ संचालक, उच्च शिक्षण,महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सादर करण्याची तसेच महाराष्ट्र राज्यात परत येऊन ३ वर्षासाठी राज्याची सेवा करुन माझ्या ज्ञानाचा फायदा राज्याला करुन देण्याचीही हमी देत आहे. मी तसे न केल्यास मला संपूर्ण अभ्यासक्रमासाठी देण्यात आलेल्या शिष्यवृत्तीच्या एकूण रकमेच्या २५ टक्के रक्कम मी संचालनालयाकडे अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतरच्या दिनांकापासून तीन वर्षाच्या आत जमा करेन.

११. आम्ही याव्दारे कळवितो की, (विद्यार्थ्याचे नाव________________________________________यांच्या पालकांचे / कुटुंबाचे व (विद्यार्थी/विद्यार्थीनी नोकरी करीत असल्यास) श्री./ कुमारी ________________________________________(विद्यार्थ्यांचे नांव) याचे सन_____________या वर्षाचे सर्व मार्गांनी मिळणारे वार्षिक उत्पन्न रुपये ८ लाख (रुपये आठ लाख) पेक्षा जास्त नाही. तथापी सदरची माहिती खोटी अथवा चुकीची असल्याचे निदर्शनास आल्यास माझी शिष्यवृत्ती रद्द होईल याची मला जाणीव असून त्याबाबतच्या सर्व आर्थिक व कायदेशीर कारवाईस मी स्वत: जबाबदार असेन.

१२. अद्ययावत जागतिक क्रमवारीत असलेल्या २०० च्या आतील QS World Ranking मधील परदेशातील विद्यापीठ / शिक्षण संस्थांमध्ये मी प्रवेश घेईन व त्या अनुषंगाने त्या देशाच्या आवश्यक त्या परीक्षा मी विहित मुदतीत उत्तीर्ण होईन व त्याबाबतची प्रमाणपत्रे संचालनालयास सादर करेन.

१३. पदव्युत्तर पदविका किंवा पदवी अभ्यासक्रमासाठी ऑफर लेटरनुसार निश्चित केलेला कालावधी व प्रत्यक्ष अभ्यासक्रम सुरु झाल्यानंतर त्या अभ्यासक्रमाचा कालावधी यांतील जो किमान कालावधी असेल त्या कालावधीपर्यंतच सदर परदेशात राहण्यास मला परवानगी असेल आणि त्यापेक्षा अधिक कालावधीकरीता मला परेदशात राहण्यास अनुमती मिळणार नाही व तसा अर्ज मी करु शकत नाही याची मला माहिती आहे व ते मला मान्य आहे.

१४. शासनाकडून शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी परदेशातील शैक्षणिक संस्था/विद्यापीठात प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमामध्ये प्रत्येकवेळी उत्तीर्ण होणे माझ्यावर बंधनकारक असून तसेच शैक्षणिक संस्था/विद्यापीठाचे प्रमाणपत्र, गुणपत्रिका व प्रगती अहवाल प्रत्येक सत्रासाठी संचालनालयास सादर करण्यात येईल.

१५. प्रत्येक सहा महिन्याच्या खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्रे (Utilization Certificates), खर्चाच्या पावत्या (Receipts) इत्यादी विद्यापीठ/शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखांकडून प्रमाणित करुन संचालनालयास सादर करण्यात येईल. तसेच सदर परदेशात शिक्षणासाठी गेल्यानंतर माझ्या निवासाची माहिती/कराराची प्रत मी संचालनालयास वेळोवेळी सादर करेन.

१६. कोणतेही कारण अथवा सबबी सांगून अभ्यासक्रम पूर्ण न करणे, विहीत प्रयोजनासाठी खर्च न करणे, खर्चात काटकसर न करणे, विहीत लाभ मर्यादेपेक्षा जास्तीची मागणी परदेशात जावून करणे, कोणत्याही प्रकारचा दबाव आणणे किंवा धमकी देणे, परदेश शिष्यवृत्ती नियमावलींतील

तरतूदींचे उल्लंघन करणे, परदेशातील नियम / अटी /तरतूदींचे उल्लंघन करणे, वाममार्गास लागणे, परदेशातील शैक्षणीक कालावधीत कोणत्याही प्रकारचे गैरकृत्य करणे व त्यासाठी दंड शिक्षा होणे, भारतीय राष्ट्रीयत्त्वास हानी पोहचवणे, भारताची बदनामी करणे या बाबी कर्तव्यातील कसूर समजण्यात येतील. कर्तव्यात कसूर केल्यास मला अपात्र ठरवून माझ्या परदेशी शिक्षणासाठी शासनाने दिलेले सर्व लाभ माझ्याकडून व्याजासह वसूल केले जातील.

१७. उपरोक्त नमूद केलेला सर्व मजकूर मला मान्य असून तो मी____________________वाचून समजून घेऊन आज दिनांक- / / रोजी ___________ मुक्कामी सही केली असे, वरील बाबींचे माझ्याकडून उल्लंघन झाल्यास मी भारतीय दंड संविधान कलम १९३ (२), १९९, २०० व ४०६ अन्वये शिक्षेस पात्र राहील, याची मला पूर्ण जाणीव आहे. मी वरील कोणत्याही कलमांचा भंग केल्यास हे बंधपत्र न्यायालयीन/प्रशासकीय अशा सर्व प्रकारच्या माझ्यावरील/आमच्यावरील कारवाईसाठी वापरले जाईल याचीही मला जाणीव आहे.

१८. सदरचे बंधपत्र मला शासनाची शिष्यवृत्ती मंजूर झाल्याने शासनाशी जोपासावयाच्या बांधिलकीच्या हेतूने लिहून देत असून या प्रशासकीय कार्यप्रणालीबद्दल माझी कोणतीही हरकत नाही. बंधपत्र शासनाकडे सादर करण्यापूर्वी मी शिक्षणासाठी संबंधित देशात गेलेलो असल्यास, माझ्या पालकांनी आणि जामिनदारांनी सादर केलेले या बंधपत्रातील अटी शर्ती मला पूर्ण बंधनकारक असतील. त्यास्तव मी ___________________, माझे पालक ________________________ आणि दोन जामीनदार ____________________ व ____________________ यांना याबाबतचे अधिकार देत असून हे बंधपत्र त्यांनी माझे वतीने सादर करण्याची अनुमती रु. ५००/- च्या बाँडपेपरवर स्वतंत्ररित्या पॉवर ऑफ ॲटर्नी नुसार मी त्यांना देत आहे, व पॉवर ऑफ ॲटर्नी मी शिष्यवृत्ती जाहीर होण्यापूर्वी स्वत: माझ्या पालकांकडे ____________________दिलेली आहे. या बंधपत्रासोबत, माझे, पालकांचे आणि जामीनदारांचे आधारकार्डच्या स्वसाक्षांकित छायांकित जोडलेल्या आहेत.

स्थळ :

दिनांक : / /

| सही | सही | सही | सही |
|---|---|---|---|
| (विद्यार्थी) | (पालक) | (जामीनदार) | (जामीनदार) |
| संपूर्ण नाव व पत्ता | संपूर्ण नाव व पत्ता | संपूर्ण नाव व पत्ता | संपूर्ण नाव पत्ता |
| दूरध्वनी क्र. / मो.क्र. | दूरध्वनी क्र. / मो.क्र. | दूरध्वनी क्र. / मो.क्र. | दूरध्वनी क्र. / मो.क्र. |

**********